# नवाकाळ शब्दकोडे-१०१



**आडवे शब्द –** १. रेशमी शालीचा प्रकार ३. गरम पातेले उचलण्याचा चिमटा ६. आमंत्रितांना दिलेले भोजन, खाना १०. शेज, गादी, बिछाना ११. नियंत्रण १३. पाठोपाठ १६. शासनाचा कररुपाने महसूल किंवा उत्पन्न १८. फुरसत, फावला वेळ २०. दारुमुळे होणारा यकृताचा मोठा विकार २३. वस्तू, जिन्नस २४. जिव्हा, गोड बोलणे २६. सांभाळणारा, एक पालेभाजी २८. अग्नी, अनल २९. बंदी ३०. काळिमा, कलंक ३१. धुमाकूळ, राडा, गोंधळ ३२. पाय, कवन, हुद्दा ३३. मिरवणूकीतले मोठे तालवाद्य ३५. नशा, धुंदी ३६. सत्यनारायणाच्या प्रसादाचे साहित्य या प्रमाणात घेण्याचा संकेत आहे ३७. दहशत, दरारा ३९. बनावट, डुप्लिकेट ४१. अकिंचन, निर्धन ४२. चेष्टा ४५. प्रहार ४७. कानाचा खालचा भाग, मूळ, जोपासना, सांभाळ ४८. अरण्य ४९. गुप्तपणे, कोणाला समजू न देता ५०. अन्नातून मिळणारे पौष्टिक घटक, व्हिटॅमिन ५२. आसरा, आश्रय ५३. चूष, फॅशन ५६. टुमदार गाव ५८. सांगणे ६०. मान ६२. निरर्थक वाद घालणारा, वाचाळ ६४. वडील, जनक ६५. सार, उकळून काढलेले सत्व ६६. उनाड, टारगट ६८. भाल ६९. फक्त ७०. वणवा ७२. घोड्याला आवडणारे मालिश ७४. उपवासाला चालणारी फळभाजी, हिची कोशिंबीर करतात ७५. म्हैस ७७. पोलिसांचे अटकसत्र ७९. देवळात नियमित पूजा करणारा सेवेकरी ८१. किमया, चमत्कार ८३. विशेष वापरात नसलेली वाट ८५. ज्यूट, यापासून पिशव्या, पडदे, तंबूचे कापड वगैरे बनवतात ८७. समशेर, खड्ग ९०. प्रयत्न, प्रयास ९२. खाष्ट व भांडखोर स्त्री ९४. बखोट, गचांडी ९५. उणीव, ददात ९७. युवती, प्रमदा ९८. व्याख्याता, भाषण देणारा ९९. आरूढ १००. भस्म, रक्षा १०१. मनाचा मोठेपणा १०४. दुधाचे पक्वान्न १०५. जुना व चांदीचा बंदा रुपया १०७. हत्तीचे पिल्लू १०८. लग्नात वधूपक्षाने दिलेल्या भेटवस्तू मांडलेली जागा १०९. घेवडा ११०. प्रवास

**उभे शब्द –** १. मनाचा निर्धार २. सुंदर स्त्री ३. वळू ४. चारित्र्य ५. व्यर्थ ७. ढग, मेघ ८. उन्हाळ्यात झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक शीतपेय ९. हा गुदगुल्या करतो असा समज असलेला धोकादायक केसाळ प्राणी १०. अंग, देह १२. पक्ष, बाजू १४. कहाणी, हकीकत १५. गणपती, गजानन १७. घोळका, झुंड १८. अभिरुचीहीन, मूल्यहीन १९. पावा, मुरली २१. जन, माणसे २२. शकुन बघण्याचा एक प्रकार २५. मागेपुढे कोणी नसलेला, विनापाश २६. निभाव २७. सर्कशीत कसरतीचे खेळ करणारा २८. वाईट कृत्य ३१. पराभव, दाणादाण ३३. झाडाचे खोड, फांद्या इ. मध्ये तयार झालेला पोकळ भाग ३४. गर्दी ३६. टोचणी ३८. मोठा ४०. कांद्याचे बी ४१. गळ्यातील अलंकार ४३. वेंधळा ४४. अपमान ४६. दुष्ट, त्रासदायक, निंदक ४७. हिवाळ्यात झाडांची जुनी पाने गळून जाणे ४८. कोल्हा ५१. जंगल ५४. नेमस्त ५५. गोळीबाराचे शस्त्र ५७. विक्रमाला गोष्टी सांगणारा भुतांचा राजा ५९. दमणे, शीण ६०. मग्न ६१. भगवान शंकराचे एक रूप ६३. दुर्दैवी, फुटक्या नशिबाचा ६४. पूर्वी घरात दिला जाणारा स्वस्त पिवळा रंग ६५. वेगळे, निराळे ६७. वायू ६९. घायपात, घणसर, केतकीचे कुंपण ७०. आर्जवे करणे, विनवणी करणे ७१. वधू ७३. परका, बाहेरचा ७६. नोकरदारांची सुट्टी ७८. उणीव, न्यून ८०. झोपमोड ८१अ. निरोप आणणारा-नेणारा ८२. अगर, अथवा ८३. स्वार्थी, अप्पलपोटी ८४. दिवस, दिन ८६. तिखटमिठाचा शिरा ८८. विवाह ८९. उष्ण व कोरडे वातावरण ९०. बैलगाडीचा एक प्रकार ९१. अग्र ९२. साजूक तुपाचे एक वैशिष्ट्य ९३. तृण, गुरांचे कोवळे अन्न ९६. दह्याचे पातळ पेय १०२. आकाश, गगन १०३. खुंटी १०५. सत्त्व, परीक्षा १०६. शान, दिमाख •

**नवाकाळ कोडे क्रमांक १०० चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. समुदाय ४. जोपासना ७. मुलायम ११. तीनतेरा १३. जून १४. जागरूक १७. सहिष्णू १८. वाचक २०. नकील २२. राजा २३. अनवरत २५. नट २६. डगमग २९. गस्त ३०. कोरडवाहू ३२. जस्त ३३. तगादा ३५. पाणीदार ३७. लस ३९. चुरा ४०. दोंद ४३. मकर ४६. दंडेली ४८. पहिला ५०. हकनाक ५३. मसलत ५५. लाट ५७. अडाणी ५८. मराळ ५९. हर ६०. कावा ६२. पाम ६४. साळू ६५. कवळ ६७. कासार ६९. रखवालदार ७१. मार्ग ७२. रजा ७३. कमी ७५. वळू ७६. लई ७७. वडीलधारा ७९. प्रणय ८१. यक्ष ८२. भग्न ८३. माग ८४. रावा ८५. बाण ८६. महेश ८७. थक्क ८८. लीज८९. पैलतीर ९०. वमन ९२. वंद्य ९३. मनन ९५. यंदा ९७. भात १००. समा १०३. भरमसाट १०५. फटका १०७. श्रमिक १०९. लवाद १११. कीव ११२. कटकट ११३. मनीषा ११४. कीटक ११५. तार ११६. धरणी ११७. करूण ११८. यज्ञ

**उभे शब्द :** २. मुलाहिजा ३. यती ४. जोते ५. पारावार ६. नाजूक ८. लायकी ९. मजा १०. मेरू १२. नमन १५. गनीम १६. कवी १७. सराईत १९. चतकोर २०. नटवा २१. लड २३. अस्त २४. वर्गणी २५. नडगी २७. गया २८. गजरा २९. गदा ३१. हूल ३४. गाठोडे ३५. पादप ३६. दादला ३८. सम ३९. चुरस ४१. बेहडा ४२. ऐना ४४. कमळकाकडी ४५. पितर ४६. दंडकारण्य ४७. लीला ४९. हित ५१. कणीक ५२. कमळजा ५४. लहर ५६. टपाल ५७. अळूमाळू ६१. वाख ६३. मदार ६६. वरई ६८. सामील ७०. वाघीण ७४. पारावार ७५. वक्ष ७६. लग्न ७७. वग ७८. धारातीर्थ ७९. प्रणव ८०. यमन ८१. यशवंत ८२. भक्कम ८३. माज ८८. लीन ८९. पैदास ९१. मर्दुमकी ९४. नक्षा ९६. उभयता ९७. भाट ९८. फाटक ९९. कामिनी १०१. मालकी १०२. मोदक १०४. सावध १०५. फट १०६. काटक १०७. श्रमण १०८. कषाय ११०. वाटप ११२. कणी

# दक्षिण मुंबईत अनेक भागात बत्तीगुल

पान १ वरून

लाइनमध्ये मोठ्या प्रमाणात व्होल्टेज चढउतार झाला. त्यामुळे ट्रॉम्बे सॅलसेट-१ ओव्हरलोडमुळे ट्रिप झाला. याचा परिणाम दक्षिण मुंबईतील वीज वितरण व्यवस्थेवर झाला. टाटा पॉवरचे हायड्रो प्लांट व्यवस्थित होते. एक तासाने टाटा पॉवरने वीज पूर्ववत केली आहे, असे टाटा पॉवरकडून कळविण्यात आले आहे. मुंबईत सीएसएमटी, भुलेश्वर, ताडदेव, परेल, सायन, वडाळा, अँटॉप हिल, दादर, लालबाग, मस्जिद, वरळी, अशा विविध भागात एक तासापासून वीजपुरवठा खंडित झाला होता. आज रविवार असल्याने फोर्ट परिसर, माटुंगा, दादर आणि सायन परिसरात आज कार्यालये सुरू नव्हती. त्यामुळे त्याचा फटका चाकरमान्यांना बसला नाही. कामाच्या दिवशी हा वीज पुरवठा खंडित झाला असता तर कार्यालयातील कामे ठप्प झाली असती. बँकांनाही त्याचा फटका बसला असता. बँकांचे व्यवहारही ठप्प झाले असते. वीज पुरवठा खंडित होण्याचा फटका लोकल सेवेलाही बसला. मुंबईतील अनेक भागातील वीजपुरवठा खंडित झाल्याने चर्चगेट ते अंधेरी विभागातील रेल्वेसेवा विस्कळीत झाली होती. पश्चिम, मध्य आणि हार्बर मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. हार्बर मार्गावर मेगा ब्लॉक असल्याने नागरिकांना त्याचा अधिक फटका बसला नाही. तसेच सुट्टीचा दिवस असल्याने कोणतीही गैरसोय झाली नाही. अनेक लोकल्स स्थानकात तसेच रेल्वे रुळावर थांबून होत्या. बराच काळ खोळंबा झाल्यामुळे रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले होते. कामानिमित्त घराबाहेर पडलेल्या नागरिकांची त्यामुळे गैरसोय झाली. कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी अनेकांनी बेस्टच्या बसचा आधार घेतला. तर अनेकांनी पुढील स्थानकात जाण्यासाठी रेल्वे रुळावरूनच पायपीट केली. पश्चिम मार्गावरील रहिवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून जोगेश्वरी उपकेंद्रातून वीजपुरवठा वाढविण्यात आला होता. दरम्यान, तासाभराच्या प्रयत्नानंतर वीज पुरवठा पूर्ववत सुरू झाला. तसेच ओव्हरहेड वायरवरील वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला. नंतर काही वेळात मुंबई सेंट्रल ते विलेपार्ले दरम्यानची रेल्वेसेवा सुरळीत करण्यात रेल्वेला यश आले.

# युक्रेन-पोलंड सीमेवर भारतीय विद्यार्थांचा छळ

पान १ वरून

चार लाईन्स करायला सांगितले. त्यानुसार आम्ही चार लाईन्समध्ये उभे राहिलो. नंतर त्यांनी तीन लाईन्स करायला सांगितले. आम्ही चार लाईन्स केल्या होत्या. त्यामुळे त्यांनी बंदुका घेऊन आम्हाला मारहाण केली. व्हिसा मिळवण्यासाठी आत गेलो तेव्हा तेथे पोलीस बंदुका आणि रॉड हातात घेऊन उभे होते. आतमध्ये गेल्यावर व्हिसाबाबत हंटर गेम खेळायचा होता. तो काय खेळ असतो ते मला माहिती नव्हते. तिथे गेल्यावर ते रॉड आणि बंदुका घेऊन उभे होते. हा खेळ खेळल्यावर तुम्हाला व्हिसा मिळेल असे ते म्हणाले. यानंतर त्यांनी तिथे असलेल्या विद्यार्थ्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. मुलगा आहे की मुलगी आहे हेही पाहिले नाही, असेही साक्षी इजनकरने म्हटले आहे. पोलिसांनी मारहाणीसोबतच मुलांचा छळही केला. ज्यांना अस्थमाचा त्रास होता त्यांना मारहाण करून त्यांना कसा श्वास घेता येत नाही असे दाखवल्याचे ती म्हणाली. युक्रेनप्रमाणे रोमानियातही अडकलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना अपमानास्पद वागणूक मिळाली आहे. १० ते १५ किलोमीटर पायपीट करुन भारतीय विद्यार्थी सीमा गाठत आहेत. मात्र त्यांनाही सीमेवर कित्येक तास बसवून ठेवले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अश्रू अनावर होत आहेत. आम्हाला येथे कुणीही विचारत नाही. आम्ही दुपारपासून निघालो आहोत. मात्र कुणीच आमच्याशी संपर्क साधलेला नाही. यापेक्षा मरण आलेले बरे. आम्हाला सुरक्षित आणण्यासाठी फक्त चर्चाच होत आहेत, असेही विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

**युक्रेनची रशियाविरोधात आंतरराष्ट्रीय न्यायालयात याचिका**

एका बाजुला युद्ध सुरू असताना युक्रेनने रशियाविरुद्ध आपली कूटनिती सुरू केली आहे. त्याचा एक भाग म्हणून युक्रेनने या हल्ल्यात निर्दोष लोकांना ठार केल्याचा आरोप करत रशियाविरोधात आंतरराष्ट्रीय न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

# दिशा सालियनच्या मृत्यूची चुकीची माहिती

पान १ वरून

नारायण राणे आणि त्यांचे पुत्र मात्र या प्रकरणाचा एका राजकीय नेत्याशी संबंध जोडत होते. तसेच तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोपही त्यांनी केला होता. दरम्यान ९ फेब्रुवारीला नारायण राणे यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेऊन पुन्हा एकदा दिशा सालियान हिची हत्या झाल्याचा तसेच तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप केला होता. त्यामुळे दिशाचे आई वडील खूपच व्यथित झाले होते आणि दिशाची बदनामी थांबवा अन्यथा आम्हालाही आमच्या जीवाचे बरे वाईट करून घ्यावे लागेल असा इशारा दिला होता. त्यानंतर महापौर किशोरी पेडणेकर आणि राज्य महिला आयोगाच्या दोन सदस्यांनी दिशाच्या आई वडिलांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले होते. त्यानंतर या प्रकरणी दिशाच्या पालकांनी राज्य महिला आयोगाकडे तक्रार केली होती या तक्रारीची गंभीर दाखल घेऊन महिला आयोगाने पोलीस ठाण्यात तक्रार करून पोलिसांना दोन दिवसात अहवाल देण्यास सांगितले होते. त्यानुसार मालवणी पोलिसांनी दिलेल्या अहवालात दिशाच्या शवविच्छेदन अहवालामध्ये तिच्यावर कोणतेही लैंगिक अत्याचार झाले नव्हते अशी माहिती महिला आयोगाला कळवली आहे. तसेच महिला आयोगाच्या तक्रारीवरून नारायण राणे आणि नितेश राणे यांच्यावर मालवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे या गुन्ह्यात राणे पिता पुत्रांची चौकशी होणार आहे.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

(सा.बा विभाग ठाणे)

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नौपाडा-कोपरी प्रभाग समितीच्या सार्व. बांधकाम विभागामार्फत **मागासवर्गीय निधी** या लेखाशिर्षकांअतर्गत प्र.क्र.२२(ड) मधील कामगार नगर येथील विस्थापित चाळ परिसरातील गटार व पायवाटांचे नुतनीकरण करणे, प्र.क्र.२२ (ड) मधील आंबेडकर रोड (दक्षिण ) येथे पंडीत चाळ परिसरात गटार व पायवाटाचे काम करणे, **इमारत देखभाल व दुरुस्ती** या लेखाशिर्षकांअतर्गत प्र.क्र.२२ (क) मधील नागसेन नगर, खारटन रोड येथील ठामपा सफाई कर्मचारी यांच्या पत्राचाळ, लफाट चाळ व परिसरातील इतर घरांवर ताडपत्री टाकणे या (३) कामाकरिता नोंदणीकृत ठेकेदारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्व. उपक्रम, स्थानिक संस्था महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत/काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करणेत आली आहे अथवा प्रस्तावित आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in वर दि.२८.०२.२०२२ ते दि.१४.०३.२०२२ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे https:://mahatenders.gov.in दि.१४.०३.२०२२ रोजी पर्यंत सायं. १२.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि.१६.०३.२०२२ रोजी स.११.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधीं समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-नौ-को/ १७७१/ २०२१-२२ **सही/-**

दि:२५.०२.२०२२ कार्यकारी अभियंता

*pls visit our oficial web-site* ठाणेमहानगरपालिका,ठाणे

*www.thanecity.gov.in*


# साहित्यिकांनी लेखनातून संवाद घडवून आणावा-भारत सासणे

पान ८ वरून

असतो. मराठी भाषेत पाटी लिहिल्यामुळे एक प्रकारे आपली मायबोली प्रत्येकाच्या ओठावर येईल. अशा प्रकारे मराठीत पाट्या लिहिण्याचा जो काही निर्णय घेतला आहे, भाषेबद्दल प्रेम निर्माण करून मायबोलीचा प्रसार करायचा प्रयत्न असू शकतो. यामुळे संवादामध्ये, मानसिकतेमध्ये बदल होणे अपेक्षित आहे.

या निर्णयामुळे मराठी भाषेला अनुकूल वातावरण तयार होईल आणि मराठीबद्दलची मानसिकता बदलेल.

**साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी मिळालेले पुरस्कार कोणते ?**

लेखनाची सार्थकता किंवा लेखकाचं सार्थक नेमकं कशात आहे, हे ठरवणं अवघड असतं. कारण, ते संमिश्र असतं. पण, याबाबत मी नक्की सांगू शकतो की, पुरस्कार-समीक्षकांची मान्यता - इतर सर्व मानमान्यता या अनुषंगिक बाबी आहेत, ते मुख्य हेतू नसतात. लेखक त्यासाठी म्हणून कधी लेखणी उचलत नाही. कदाचित तो यातून स्वतःचा शोध घेतो आणि त्या शोधातून त्याला काही व्यक्त करायचं असतं. त्या अर्थाने लेखक एका प्रतिसृष्टीचा मालक आहे. माझ्या अनेक पुस्तकांना राज्य शासनाचे प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले आहेत.

**तुमचे स्वतःचे आवडते लेखक कोणते तसेच सध्याच्या साहित्य प्रवाहाबद्दल काय सांगाल?**

आवडीचे म्हणाल तर सर्व भाषांमधले माझे आवडते लेखक आहेत मोंटो, मुन्शी प्रेमचंद, त्यांच्या साहित्यात त्यांनी ज्याप्रकारे मानवी भावभावनांचा तळ गाठला, शोधला तसा इतका विचक्षणरित्या इतर कुठे आढळत नाही. अगदी खोलात जाऊन त्यांनी माणूस शोधला आहे, हे विशेषत्वाने मला भावतं. मराठीत म्हणाल, तर तेव्हा दोन ठळक प्रवाह होते. मनोरंजन आणि सामाजिक प्रबोधन. त्यात आपल्याकडे उत्तम स्टोरी टेलर होते. उदा. नाथ माधव, ना. ह. आपटे आणि ह. ना. आपटे, नारायण धारप, गो. ना. दातार आणि हाडप हे सगळे माझे आवडते लेखक आहेत. त्यांनी जी अद्भुत सृष्टी साहित्यात निर्माण केली, त्या मनोरंजकतेचं मला कौतुक वाटतं. कादंबरी वाचायला यांनी आपल्याला शिकवलंय, हे विसरता येणार नाही. त्याकाळातले हे सर्व लोकप्रिय 'मास्टर स्टोरी टेलर' मला आवडतात. त्यानंतरच्या काळात चि. त्र्यं. खानोलकर, जीए यांची नावे घ्यावीच लागतील. याशिवाय, 'ह्यूमन सायकॉलॉजी'वर लिहिणारे गोखलेंसारखे लेखक लक्षवेधक आहेत. खरंतर मराठीतील सर्व प्रमुख मान्यवर लेखकांचं लेखन वाचतच मी घडलो. त्याची यादी फार मोठी आहे. तसंच समकालीनांमध्ये चांगलं लिहिणारे खूप लेखक आहेत. ते सर्वच जवळचे असल्याने कुणा एकाचं नाव घेणं योग्य ठरणार नाही.

**समाजमाध्यमांचा साहित्यावर आणि मराठी भाषेवर काय परिणाम झाला ?**

मी असं म्हणणार नाही. उलट समाजमाध्यमांमुळे आजची तरुण पिढी व्यक्त होते आहे. कस आहे, माध्यम कोणते आहे ते महत्वाचे नाही, पण तुम्ही कसे आणि काय व्यक्त होताय ते महत्वाचे आहे. फेसबुकसारख्या समाजमाध्यमांवर लेखक कथा, लेख लिहू लागले आहेत. अनेकांनी स्वतःचे ब्लॉग लिहायला सुरुवात केली आहे. समाजमाध्यमे ही प्रस्थापित मुद्रित आणि दृकश्राव्य माध्यमांना समांतर असणारी माध्यमे आहेत. त्या माध्यमाचे विश्व समांतर आहे आणि घडामोडींना विविध बाजूंनी समजून घ्यायचे असेल तर समाजमाध्यमे उपयुक्त ठरू शकतात. विशिष्ट विचारधारा, साहित्यसंस्था, माध्यम संस्था, साहित्य संमेलने, मासिके, रेडिओ-टीव्ही चॅनेल, प्रकाशन संस्था, साहित्यप्रवाह यांनीही त्यांची त्यांची फेसबुक पाने तयार केली आहेत अथवा त्यांचे व्हाट्सप ग्रूप निर्माण केले आहेत. त्यातच त्या माध्यमांचे यश आहे. समाजमाध्यम हे तरुणांना त्यांचे वाटणारे माध्यम आहे. ज्याने-त्याने त्याच्या हाती एखादी वस्तू आली, की तिचा वापर कसा करायचा हे ठरवायचे असते. ज्याने-त्याने त्याच्या हाती दगड दिला तर दुस-याचे डोके फोडायचे, की त्यातून मूर्ती घडवायची वा तो दगड खड्डा बुजवण्यासाठी वापरायचा हे ठरवायचे असते. बदलता काळ माणसाच्या हाती अनेक नव्या बाबी देणार आहे. त्याने स्वप्नातही पाहिले नव्हते असे तंत्रज्ञान त्याच्या घरात असणार आहे. त्यावर शाप की वरदान? अशी चर्चा करत बसण्यापेक्षा त्या बाबींचा सकारात्मक लाभ घेणे लेखक म्हणून मला गरजेचे वाटते. त्यामुळेच मी समाजमाध्यमांकडे जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचण्याचा मार्ग म्हणून, मित्र जोडण्याचा मार्ग म्हणून पाहतो.

**उदगीर येथे होणाऱ्या ९५ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाबद्दल काय सांगाल ?**

उदगीर येथे होणाऱ्या संमेलनाबद्दल संमेलनाध्यक्ष म्हणून आताच बोलणे योग्य ठरणार नाही. होय, पण मी नक्कीच काही सूचना करू इच्छितो. विशेषतः परिसंवादांचे विषय असे ठेवले जावेत की, ज्यातून चांगली साहित्य चर्चा घडून येईल. उगीचच साहित्यबाह्य गोष्टी त्यात शिरून वाद ओढवले जाऊ नयेत. याशिवाय बालसाहित्यावर विशेष चर्चा किंवा काही कार्यक्रम असावा, वाङमयीन दर्जा सांभाळला जाईल, असेच सर्व कार्यक्रम असावेत. कथा-कादंबरी अशा मुख्य साहित्यप्रकारांना स्थान मिळावे, असा आग्रह मी धरणार आहे, नक्की!

**मराठी साहित्य आणि वाचन चळवळीचं भवितव्य कसं आहे?**

दूरचित्रवाणी वाहिन्या, संगणकाच्या जमान्यात धावती जीवनशैली पुढे येत असली, तरी वाचन करणारे जागीच आहेत. त्यांची संख्या फार कमी होत नाही. पुस्तक प्रदर्शन, विक्री, व्यवहार चांगले होत असून, मागणी वाढती आहे. वाचकांची अभिरुची बदलत चालली आहे. प्रवासवर्णन, थ्रील, सस्पेन्स पुस्तकांना मागणी वाढत आहे. हा बदल होत चाललाय. लोक वाचन करतात, चिंतन करतात. वेगवेगळ्या मुखपत्रावर लोक नोंदी घेऊन भाष्य करतात. चांगलं, वाईट वाचणाऱ्यांची संख्या कमी जास्त होत आहे. परंतु वाचन संस्कृती टिकून आहे, ही बाब महत्वाची आहे.

**आजच्या लिहित्या पिढीबद्दल काय वाटते ?**

मी व्याख्याने, चर्चासत्राच्या निमित्ताने ग्रामीण भागातील लेखकांना भेटत असतो. त्यांच्याकडे लेखांची एक वेगळी शैली असल्याचे जाणवते. खरं तर विवेकाचा आवाज हा समाजाचा आवाज असतो. सध्या चिंता वाटावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. समाजात संभ्रम निर्माण होत आहे अशावेळी समाजाचा आरसा असणाऱ्या लेखकांनी विवेकाचा आवाज ऐकलाच पाहिजे आणि ती आजच्या काळाची नितांत गरज आहे. वाचकांनी वेळात वेळ काढून चांगलं ते वाचलं पाहिजे. नवलेखकांनी चिंतनशीलता, सामान्यांची जगण्याची करुणा मनात ठेवून जीवनवादी असं लेखन केलं पाहिजे. सामान्य माणसाला आजचं जगणं कोठे नेतय. बाहेर कोणतं संकट दार ठोठावत आहे, याबद्दलची जागरूकता ठेवली पाहिजे. आजची पिढी आश्वासक आहे. एक काळ असा होता कि साहित्य निर्मितीचा केंद्रबिंदू म्हणून फक्त पुणे, मुंबईकडे पाहिले जायचे. आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. आज ग्रामीण भागातले लेखक लिहतायत आणि त्यांचे साहित्य हेच आज मुख्य प्रवाहातील साहित्य आहे. तेव्हा त्यांनी लिहिले . फक्त व्यासपीठ आणि पुरस्कार या दोन्हीपासून त्यांनी जरा जपून राहावे. कारण एकदा ती सवय लागली कि लेखन बाजूला पडते.


**नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये ई लिलाव विक्री सूचना**

**केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**

सीआयएन: U45400MH2007PTC234297

नोंद. कार्या.: स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, शीव तुर्भे मार्ग, चेंबूर, मुंबई महा. ४०००७१.

लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. २४.०३.२०२२ रोजी दु. ०२.०० ते सायं. ०४.०० पर्यंत

(प्रत्येकी ५ मिनिटे अमर्यादित विस्तारासह)

मान. राष्ट्रीय कंपनी कायदे न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे दि. २७.१२.२०१९ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकांद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट ऋणको)च्या मालमत्तांची विक्री. मालमत्तांची विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ncltauction.auctiontiger.net द्वारे करण्यात येईल. लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्तांचा तपशील, त्यांची राखीव किंमत, ईएमडी रक्कम आणि वाढीव बोली खालील तक्त्यामध्ये देण्यात आल्या आहेत:

| मालमत्ता | राखीव किंमत (रु.मध्ये) | ईएमडी रक्कम (रु.मध्ये) व तिच्या सादरीकरणाची वेळ | बोलीची विस्तार रक्कम (रु.मध्ये) |
|---|---|---|---|
| तारा कुंज इमारत, तळमजला, वाकडेवाडी, वाकडेवाडी पोलीस स्थानकासमोर, मुंबई पुणे महामार्ग, एसबीआय शाखेच्या मागे,पुणे ४११००३, महाराष्ट्र येथे स्थित कॉर्पोरेट ऋणकोच्या दोन संलग्न सदनिका<br>मालमत्तेशी संबंधित अधिक तपशील आणि लिलावाच्या अटी आणि शर्तीकरिता, कृपया कॉर्पोरेट ऋणकोची वेबसाईट https://ksspetron.in/liquidation.html येथे उपलब्ध प्रक्रिया दस्तऐवज पहा. | ९७,७५,०००/- | ९,७७,५००/- दि. २८.०२.२०२२ ते दि. १८.०३.२०२२ | रु. ५०,००० किंवा त्यापेक्षा जास्त |

टीपा:

१) ई-लिलावाद्वारे मालमत्तांची विक्री "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर" करण्यात येईल.

२) कोणत्याही अधिक माहिती किंवा स्पष्टीकरणाकरिता, तुम्ही परिसमापक यांना ०११-४९१२१६४४-४५ येथे किंवा त्यांचे संघ सदस्य, सीएस मनिष व्यास यांना +९१ ९६६७०९०१३५ येथे संपर्क साधावा.

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) करिता

सही/-

सीएस विनीत के. चौधरी

परिसमापक

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात

आयबीबीआय नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246

liquidatorksspetron@vkcindia.com (प्रक्रिया विशिष्ट)

ip.vineetchaudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)

परिसमापकाचा आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता:

डी-३८, एलजीएफ (एल/एस), दक्षिण विस्तार, भाग-II, नवी दिल्ली-११००४९

दिनांक: २८.०२.२०२२

ठिकाण: नवी दिल्ली